# शुध्दीपत्रक

**अहमदनगर जिल्हा परिषद, जिल्हा निवड समिती, अहमदनगर**
**पर्यवेक्षिका गट क, सरळसेवा भरती २०१५**

जाहिरात क्र.    /२०१५    अहमदनगर    दि. ०४/११/२०१५

अहमदनगर जिल्हा परिषदेमधील खालील नमुद पदावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील तरतुदींनुसार नामनिर्देशनाद्वारे संपूर्णतः तात्पुरत्या व हंगामी स्वरुपात निवडीसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात गट क या संवर्गातील पदांच्या अनुशेषांच्या सरळसेवा भरतीसाठी जिल्हा परिषद अहमदनगर अर्ज मागवित आहे.

त्या अनुशंगाने इकडील जाहिरात क्रमांक १/२०१५ दि. ०२/११/२०१५ अन्वये पर्यवेक्षिका गट क या पदाच्या शैक्षणीक अर्हते संदर्भात खालील प्रमाणे जाहिरात देण्यात आलेली आहे.

| पद क्रमांक | पदाचे नांव | वेतन श्रेणी | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | पर्यवेक्षिका (ए.बा.वि. से.यो) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४१०० | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट तेरा मधील (४) मधील तरतुदीं नुसार पर्यवेक्षिका या पदांकरिता शैक्षणिक अर्हता पुढील प्रमाणे राहील. सदर परिशिष्टातील (४)२ (अ) ज्यांनी एखाद्या संविधीक विद्यापीठाची खास करुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बाल विकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयातील स्नातक ही पदवी धारण केली आहे अशा महिला उमेदवार |

**उपरोक्त बाबी जाहिरातीत नमुद करण्यात आलेल्या आहेत. सदर बाबत उपरोक्त नमुद शैक्षणीक अर्हते व्यतिरिक्त बाल वाडी सेविका व अंगणवाडी सेविका, एबाविसे प्रशिक्षण केंद्राच्या मुख्याध्यापिका, अध्यापिका किंवा दोन्ही यांचे बाबतीत खालील अटी व शर्तींचे देखील विस्तृत पणे** माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

आवश्यक शैक्षणिक अर्हता असणा-या बालसेविका व अंगणवाडी सेविकांच्या व मध्यमस्तर एकात्मिक बाल विकास सेवा अधिका-यांच्या प्रशिक्षण केंद्राच्या अध्यापिका किंवा मुख्याध्यापिका यांच्या बाबतीत, तिने जेवढा काळ अध्यापिका किंवा मुख्याध्यापिका म्हणून किंवा दोन्ही नात्याने उत्क्त प्रशिक्षण केंद्रात सेवा केली असेल तेवढया काळाकरिता शिथिल करता येईल, परंतु आणखी असे की, कमाल वयोमर्यादा ही अट, **मात्र हा काळ कमाल १५ वर्षांचा किंवा वयाच्या ४५ वर्षापर्यंतचा असेल,**

उपरोक्त प्रमाणे नोंद घेण्यात येऊन उमेदवारांनी त्यांचे अर्ज ऑनलाईनपध्दतीने भरावेत. सदरची जाहिरात संकेतस्थळ **(वेब साईट. http://nagarzp.gov.in ) प्रसिध्द करण्यात आली आहे.**

सदस्य सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद अहमदनगर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर